IJCRT.ORG ISSN : 2320-2882

INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)

An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळाचे विश्लेषणात्मक अध्ययन

**संशोधक**
शुभम संजीव मासुरकर
ग्रंथपाल
डॉ एस. सी. गुल्हाणे प्रेरणा वाणिज्य,
विज्ञान आणि कला महाविद्यालय नागपूर

**मार्गदर्शक**
डॉ. श्रध्दा अनिलकुमार नायडू
प्राचार्य
दयानंद आर्य कन्या महाविद्यालय, नागपूर.

**सारांशः—**

महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळाचे विश्लेषणात्मक अध्ययन करूण या संशोधन लेखाचा उद्देश महाराष्ट्र राज्यातील कृषी विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळावरील विविध विभाग आणि विभागातील माहीती शोधणे हा आहे. आणि संशोधन लेखामध्ये कृषी विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळावरील अद्ययावत माहितीवर भर दिलेला आहे.

**किवर्डः—** कृषी विद्यापीठ, महाराष्ट्र ग्रंथालय संग्रह, ग्रंथालय संकेतस्थळ, ग्रंथालय सेवा.

**प्रस्तावना :—**

कृषी विद्यापीठ ग्रंथालयाचा विचार करत असताना मुळात 'ॲगर' या लॅटीन शब्दापासून 'फिल्ड' असा शब्द तयार झाला. म्हणजेच शास्त्रीय भाषेमध्ये जमिनीचा तुकडा असा झाला. हा शब्द फार प्राचीन आहे. जसजसा समाजामध्ये बदल होत गेला तसतसा शेतीच्या शब्दात(अर्थात) बदल झाला. काळानुसार जसजसी अन्न धान्याची टंचाई भासू लागली. म्हणून शेतीवर संशोधन करण्याची गरज समोर आली. त्यामुळे देशात परदेशात कृषी शिक्षणासबंधीत विद्यापिठे स्थापन करण्यात आले. कृषी शिक्षण आणि संशोधन कार्यासंबंधीत वाचन साहित्य ग्रंथ—संग्रहाचा पाठ पुरवठा करण्यासाठी कृषी विद्यापीठात कृषी विद्यापीठ ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. भारत हा कृषी प्रधान असुन देशात कृषी व शेती संशोधन कार्याकरीता वेगवेगळ्या संस्था प्रचलीत झाल्या त्यामध्ये आंतरराष्ट्रीय कृषी विज्ञान व तंत्रज्ञान माहिती प्रणाली (AGRIS)ही महत्वाची संस्था आहे.

ॲग्रीस हे एक कृषी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात माहिती पुरविणारे आंतरराष्ट्रीय पातळीवरील केंद्र आहे. ॲग्रिस ची निर्मिती अन्न धान्य कृषी संघटना फूड ॲग्रीकल्चर ऑर्गनायझेशन (FAO) द्वारे करण्यात आलेली आहे. ज्याच्या उद्देश ''जगातील दृश्य—अदृश्य वैज्ञानिक(सायंटिफिक) विषयांवरील विविध प्रकारची माहिती गोळा करणे'' हा आहे. ॲग्रिसमध्ये विशेषतः वनस्पती आणि प्राण्यांची निर्मिती आणि संरक्षण, पिकांची कापणी करणे, जंगले, मासेमारी, कृषी आणि पर्यावरणाशी संबंधीत असलेले शेती विषयक उद्योग इत्यादी विषयीचा या प्रणालीमध्ये समावेश करून त्यासंबंधित संपूर्ण अद्ययावत नवनवीन माहिती संग्रहित करण्याचे व संशोधकांपर्यत पोहचविण्याचे कार्य केले जाते. शेती विषयक माहिती प्रणाली चा विकास करून या माहितीचा प्रसार करणे हा प्रमुख उद्देश ॲग्रिसचा आहे.

मानवास आवश्यक असलेली आर्थिक शेती, ग्रामीण विकास, जल प्रणाली, कृषी बँक, रासायनिक खते आणि शैक्षणिक प्रणाली या सर्वाचा शेती व्यवसायात समावेश होतो. शेती व्यवसायाचा अधिक प्रमाणात जलद गतीने विकास होण्याच्या दृष्टिकोनातून निरनिराळे साहित्याचे संग्रह ॲग्रिस या प्रणालीद्वारे केले जाते. यासाठी विविध विषयांवरील ग्रंथसूची चा संग्रह करून ठेवला जातो.

**संदर्भ साहित्याचा आढावाः–**

अलिकडच्या काळात संकेतस्थळ हे प्रभावी कार्यक्षम जाहीरात माध्यम आणि माहिती प्रसार साधन म्हणून जगाच्या कान्याकोपऱ्यात माहिती प्रसारीत करण्यासाठी वापरले जात होते अभ्यासकांना किंवा संशोधकांना अद्ययावत माहीती मिळावी आणि वापरकर्त्यांमध्ये माहीतीचा प्रसार करता यावेत यासाठी ग्रंथालय त्यांचे संकेतस्थळ विपणन साधन म्हणून विकसित करत आहेत. ज्यात संग्रह, सदस्यता, सेवा, नियम याद्वारे ग्रंथालय संकेतस्थळाचा अधिकाधीक उपयोग करता येईल. एंकदरीत संशोधन कार्य दर्जेदार होण्यास मदत होते. https://shodhganga.inflibnet.ac.in, http://shodhgangotri.inflibnet.ac.in/ या संकेतस्थळावर संशोधन अध्ययनाशी संबंधित साहित्याचा आढावा घेतला असता पुढील संशोधन लेख आढळून आले. याचा उपयोग पुढील संशोधन विषयाचा अभ्यास करण्यात उपयोगी पडणार आहे.

**आचार्य पदवी प्राप्त शोध प्रबंध साहित्याचा आढावा**

1. निलेश कुमार या संशोधन कर्त्याने बाबासाहेब भिमराव आंबेडकर विद्यापिठाअंर्तगत ग्रंथालय व माहिती शास्त्र विभागातुन Content Analysis of Select University Library Websites of India An Evaluative Study हा विषय घेउन डॉ. शिल्पी वर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली 2019 मध्ये संशोधन प्रबंध सादर करून आचार्य पदवी प्राप्त केली. या संशोधन अहवालात Computer Science, Engineering and Technology , Library Information and Science इ. विषयावर सखोल अध्ययन कलेले आहे.
2. शिवबसप्पा बस्वराज या संशोधन कर्त्याने गुलबर्गा विद्यापिठाअंर्तगत ग्रंथालय व माहिती शास्त्र विभागातुन Library Websites Of RandD Institutions Of Government Of India An Evaluative Study हा विषय घेऊन डॉ ललिथा सामी यांच्या मार्गदर्शनाखाली 2016 मध्ये संशोधन प्रबंध सादर करून आचार्य पदवी प्राप्त केली. या संशोधन अहवालात Evaluative, Library and information science, Monitoring, Websites इ. विषयावर सखोल अध्ययन कलेले आहे.

**नियतकालिकेतील संशोधन लेख साहित्याचा आढावा**

1. एस पी जैन या संशोधन कर्त्याने Status of agricultural libraries in : A Critical analysis हा विषय घेऊन Annals of Library and Information Studie या नियतकालीकेत संशोधन लेख सादर केले.
2. सायमा कुतुब या संशोधन कर्त्यीने Library web sites in Pakistan: an analysis of content हा विषय घेऊन Emeral Insight नियतकालिकेत 25 सप्टेंबर 2009 मध्ये संशोधन लेख सादर केले.
3. एलिझाबेथ स्टेफन या संशोधन कर्त्यीन A Usability survey at the university of Mississippi libraries for th improvement of the library home page हा विषय घेऊन The jounal of academic librarianship नियतकालिकेत खंड क 32 अंक 1 जानेवारी 2006 पानं क्र. 35– 51 मध्ये संशोधन लेख सादर केले.
4. बार्बरा ए. ब्लमर या संशोधन कर्त्याने A Literature Review of Academic Library Web Page Studies हा विषय घेऊन Journal of web librarianship नियतकालिकेत 12 ऑक्टोबर 2008 मध्ये पानं क्र. 45–64 संशोधन लेख सादर केले.

**शोधगंगोत्री या संकेतस्थळावरील संशोधन प्रकल्प आराखडा सांहित्याचा आढावा.**

1. वनिता जैन या संशोधन कर्त्यीने श्री जगदीशप्रसाद झाबरमल तिबरेवाला विद्यापीठाअंर्तगत ललित कला विद्याशाखा विभागातुन Content analysis of library services in library through library website with special reference to mumbai region a study हा विषय घेऊन डॉ. दया श्रीधर यांच्या मार्गदर्शनाखाली 2014 मध्ये संशोधन प्रकल्प सादर केले आहे. या संशोधन प्रकल्पामध्ये Library Science या साहित्यातुन संशोधन संदर्भात आढावा घेतला आहे.

**संशोधन पध्दतीः–**

आजच्या युगाचा उल्लेख वैज्ञानिक युग म्हणून केला जातो. **"संशोधन"** ही ज्ञान प्राप्त करण्याची वैज्ञानिक पध्दती आहे. शास्त्रांचा विस्तार आणि विकास करण्यासाठी संशोधने केली जातात. प्रत्येक शास्त्राच्या अभ्यास विषयानुसार त्यातील संशोधनाचे स्वरुप वेगवेगळे असते. शास्त्राचा विकास संशोधन आणि तंत्र यामुळे घडून येतो या तंत्राला शास्त्रीय पध्दत असे म्हणतात. संशोधन आणि शास्त्र ही परस्परावलंबी आहेत. अनुभवाधिष्ठित माहिती व तथ्ये संशोधनाव्दारे मिळवली जातात. संशोधनाव्दारे समस्यांवर उपाय शोधले जातात या संदर्भात **गुड व हॅट** या विचारवंतानी, शास्त्राची व्याख्या पुढील प्रमाणे दिली आहे.

'जे विश्व मानवाकडून मिळणाऱ्या अनुभवासाठी ग्रहणक्षम आहे. अशा संपूर्ण अनुभावित विश्वाकडे जाण्याची पध्दती म्हणजे शास्त्र होय'.

**व्यष्टी अध्ययनाचा अर्थ आणि स्वरुपः–**

सामाजिक संशोधन करताना संशोधकाला एखादी व्यक्ती, गट, सामाजिक संस्था किंवा एखादा समुह यांची अध्ययन एकक म्हणून निवड करावी लागते त्या विशिष्ट अध्ययन एककाचे सर्वांगीण आणि परिपूर्ण असे अध्ययन करण्याच्या पध्दतीला व्यष्टी अध्ययन पध्दती असे म्हणतात. प्रस्तुत संशोधन कार्यात व्यष्टी अध्ययन पध्दतीचा अवलंब केला आहे.

**संशोधनाचा आराखडाः–**

कोणतेही कार्य सुव्यवस्थित पार पाडावयाचे झाल्यास प्रथम त्या कार्याचा आराखडा तयार करावा लागतो. व्यवहाराचा आढावा घेतला तर असे स्पष्ट दिसते की काही योजना आखूनच तो आपले उद्दिष्ट साध्य करीत असतो.

**संशोधन आराखडयाची आवश्यकताः–**

- काटेकोर निष्कर्षाची मांडणी
- तंत्रसाधना संबंधीचा विचार
- सुलभ तथ्य विश्लेषण

संशोधन आराखड्याची आवश्यकता लक्षात घेता संशोधन आराखड्याच्या विविध प्रकारापैकी प्रस्तुत संशोधन कार्यात वर्णनात्मक आराखड्याचा उपयोग केला आहे.

**अध्ययनाचे उद्‌देश :–**

1. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयाचा शोध घेणे.
2. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालयाचा परिचय करून घेणे.
3. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रथालय संकेतस्थळावरील ग्रंथालय विभाग व त्या विभागातील माहिती मिळविणे.
4. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रथालय संकेतस्थळावरील माहिती सामग्री यांची सुची तयार करणे.
5. महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळावरील दिल्या जाणाऱ्या ग्रंथालय सेवाचे सर्वेक्षण करणे.

**नमुना निवडः–**

प्रस्तुत संशोधन कार्याकरीता महाराष्ट्रातील 6 कृषी विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळाची निवड करण्यात येत आहे. कृषी विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळामधील विभाग व माहितीचे विश्लेषन आणि अद्ययावतता यांचे अध्ययन केला आहे.

**महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे**

| अनुक्रं. | महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठांची नावे | स्थापना वर्ष | ठिकान | संकेतस्थळाचे नाव |
|---|---|---|---|---|
| 1 | सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन | 6 जून 1961 | मुंबई | www.cife.edu.in |
| 2 | महात्मा फुले कृषी विद्यापीठ | मार्च 1968 | राहूरी | https://mpkv.ac.in/ |
| 3 | डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ | 20 ऑक्टोंबर 1969 | अकोला | https://www.pdkv.ac.in/ |
| 4 | डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ | 18 मे. 1972 | दापोली | dbskkv.org |
| 5 | व्संतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ | 1972 | परभणी | www.vnmkv.ac.in |
| 6 | महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर | 3 डिसेंबर 2000 | नागपूर | www.mafsu.in |

तक्ता क. 1

**1. सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन, मुंबईः—**

सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज एज्युकेशन ग्रंथालय हे मत्स्य व्यवसाय संबंधित आणि संशोधनांसाठी राष्ट्रीय सुविधा आहे. यात मासे, मत्स्यपालन, मत्स्यपालनमेरी कल्चर, बायोटेक्नॉलॉजी, जेनेटिक्स, इकोलॉजी, प्रदुषण, पोषण अन्न प्रक्रिया तंत्रज्ञान, क्राफ्ट आणि गियर, ओशनोग्राफी रिमोट सेन्सिंग लिमनोलॉजी, प्राणीशास्त्र सुक्ष्मजीवशास्त्र संगणक अशा विविध विषयांवरील ग्रंथांचा संमृध्द संग्रह आहे.

**2. महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरीः—**

महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी हे महाराष्ट्रातील प्रमुख कृषी विद्यापीठ आहे जे शेतकऱ्यांना शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षणाद्वारे सेवा देते. महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम 1967 च्या अनुषंगाने सुरूवातीला महाराष्ट्र कृषी विद्यापीठ संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी स्थापन करण्यात आले आणि मार्च 1968 मध्ये मुंबई येथे कार्यालयासह कार्यरत झाले.

1969 मध्ये कार्यालय कृषी महाविद्यालय पुणे येथे स्थलांतरित करण्यात आले पुढे 1972 मध्ये महाराष्ट्रात चार कृषी विद्यापीठे स्थापन करण्यात आले. महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी हे 1969 मध्ये 10 जिल्ह्यांमध्ये कार्यक्षेत्र असलेल्या पश्चिम महाराष्ट्रासाठी स्थापन करण्यात आलेले एक आहे. जळगाव, नंदुबार, धूळे, नशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली आणि कोल्हापूर महान समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या नावावरून या विद्यापीठाला नाव देण्यात आले आहे.

**3. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोलाः—**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठची स्थापना 20 ऑक्टोबर 1969 रोजी अकोला येथे मुख्यालयासह झाली. या कृषी विद्यापीठाचे नाव विदर्भाचे सुपुत्र डॉ पंजाबराव उर्फ भाऊ साहेब देशमुख यांच्या नावावर ठेवण्यात आले आहे. जे सरकारचे कृषी मंत्री होते. भारतामधील या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र विदर्भातील अकरा जिल्ह्यांमध्ये पसरलेले आहे. विद्यापीठ अधिनियम 1983 साली महाराष्ट्र शासनानुसार विद्यापीठाकडे कृषी शिक्षण संशोधन आणि विस्तार शिक्षणासह ब्रीडर आणि पायाभूत बियाणे या कार्यक्रमाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. विद्यापीठाचे मुख्य परिसर अकोला येथे आहे. कृषी महाविद्यालय कृषी अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालय वनीकरण महाविद्यालय फलोत्पादन महाविद्यालय आणि पदव्युत्तर संस्था या पाच महाविद्यालयांमध्ये मुख्य कॅम्पस मधील शैक्षणिक कार्यक्रम पसरलेले आहेत.

**4 डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीः—**

कोकण प्रदेश नैसर्गिक साधन संपत्तीची उदार देणगी असूनही मोठ्या प्रमाणावर अविकसित राहिला आहे. या व्यक्ती ने सक्षम आणि कर्तबगार पुरूषांचे रोजगाराच्या शोधात मुंबई आणि पुण्या सारख्या जवळपासच्या भागात स्थलांतरीत होण्याच्या विचित्र सामाजिक समस्येकडे लक्ष वेधले आहे. वृध्द पुरूष स्त्रिया आणि लहान मुल यांना मागेटाकून पारंपरिक पध्दतीने शेतीकडे लक्ष वेधलेआहे.

कोकणचा प्रदेश महाराष्ट्र राज्याच्या इतर भागांपेक्षा वेगळा असून हवामान परिस्थिती व मातीचे प्रकार, कालाकृति सह्याद्री पर्वतरांगा आणि अरबी समुद्र यांच्या मधील स्थान पिके आणि पीक पध्दती जमीन धारणा आणि सामाजिक आर्थिक परिस्थिती यांच्या मूळे वेगळे आहे. तसे पाहता शेतकरी , कृषी आणि संलग्न क्षेत्रातील समस्याही महाराष्ट्रातील इतर भागांपेक्षा पूर्णपण`भिन्न आहेत. या समस्येमुळे महाराष्ट्र सरकारने 18 मे 1972 रोजी कोकण कृषी विद्यापीठाची स्थापना केली शिक्षण देणे विशिष्ट समस्यांवर संशोधन करणे आणि शेतकरी समुदायामध्ये सुधारित पीक उत्पादन तंत्रज्ञानाचा प्रसार करणे.

5. **वसंतरावनाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणीः—**

वसंतरावनाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ हे महाराष्ट्र राज्यातील सहा कृषी विद्यापीठांपैकी एक आहे. मूळ महाराष्ट्र कृषी विकासाच्या प्रादेशिक आकांक्षापूर्ण करण्यासाठी 18 में 1972रोजी स्थापना झाली. महाराष्ट्रातील मराठवाडा विभागामध्ये कृषी संबंधित क्षेत्रात शिक्षण देणे. संशोधन करणे आणि तंत्रज्ञान हस्तांतरण सुलभ करणे या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. हैदराबाद राज्य सरकारने 1956 मध्ये परभणी येथे या प्रदेशात पहिले कृषी महाविद्यालय स्थापन केले. निजामाच्या राजवटीत मात्र कृषीशिक्षणफक्तहैदराबाद येथेचउपलब्ध होते परंतु पीक संशोधन केंद्रे उदा. ज्वारी, कापूस, फळे, या प्रदेशात अस्तित्वात होते. तेव्हा पासून परभणी हे मराठवाड्यातील शैक्षणिक संशोधन आणि विस्तार उपक्रमांचे केंद्र राहिले आहे.

**6. महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरः—**

महाराष्ट्र पशू आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ (MAFSU) ला 17 नोव्हेंबर 2000 रोजी अधिकृतपणे अधिसूचित करण्यात आले आणि त्याची स्थापना राज्य अधिनियम क्रमांक 1998MAH XVII FO 1998 अंर्तगत 03 डिसेंबर 2000 रोजी नागपूर येथे मुख्यालयासह करण्यात आली. राज्यातील सहा कृषी विद्यापीठांपैकी पाच पशू वैद्यकीय महाविद्यालये एक पशू वैद्यकीय व पशु विज्ञान पदव्युत्तर संस्था आणि एक दुग्ध तंत्रज्ञान महाविद्यालय हस्तांतरित करून विद्यापीठाचा समावेश करण्यात आला आहे. विद्यापीठ बाल्याबस्थेत असले तरी घटक महाविद्यालये बरीच जुनी आहे.

**संशोधन कार्याच्या मर्यादाः—**

प्रस्तुत संशोधन कार्य महाराष्ट्रातील 6 कृषी विद्यापीठ ग्रंथालयाची ओळख करून संकेतस्थळावरील वेगवेगळ्या विभागातील माहीतीचे मुल्यमापन करण्या पुरते मर्यादीत केले आहे.

**महाराष्ट्रातील कृषीविद्यापीठाच्या संकेतस्थळावरील ग्रथालयाची सर्वसामान्य माहिती**

| सामान्य माहिती | मुंबई | राहूरी | अकोला | दापोली | परभणी | नागपूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रंथालयाबद्दल | √ | √ | √ | √ | √ | √ |
| ग्रंथालयाची भूमिका | √ | √ | X | X | √ | √ |
| कामाचे तास आणि सुट्टी | √ | √ | X | √ | √ | √ |
| सदस्यत्व | X | X | √ | X | √ | √ |
| ग्रंथपाल | X | √ | X | √ | √ | X |
| ग्रंथालय सहाय्यक कर्मचारी | X | √ | X | X | √ | X |
| ग्रंथालय विभाग | X | √ | X | X | √ | X |
| चालु संशोधन | X | X | X | √ | √ | X |
| ग्रंथालय सेवा | √ | √ | √ | √ | √ | √ |

तक्ता क 2

**विद्यापीठीय ग्रंथालयातील संग्रह**

| सामान्य माहिती | मुंबई | राहूरी | अकोला | दापोली | परभणी | नागपूर |
|---|---|---|---|---|---|---|
| ग्रंथ | √ | √ | √ | √ | √ | √ |
| नियतकालिक | √ | √ | √ | √ | √ | √ |
| संदर्भग्रंथ | √ | √ | √ | √ | √ | √ |
| शोध प्रकल्प / शोध प्रंबध | √ | √ | √ | √ | √ | √ |
| | | | | | | |

तक्ता क. 3

**विद्यापीठीय ग्रंथालयीन संग्रहः—**

कृषी विद्यापीठीय ग्रंथालयीन संग्रहामध्ये सर्व ससांधनाचा समावेश होता, त्यात भौतिक आणि डिजिटल नेटवर्क द्वारे उपलब्ध असलेल्या संसाधनांचा समावेश होतो. सध्याच्या संशोधन कार्यात कृषी विद्यापीठांच्या संकेतस्थळावरील ग्रंथालय सग्रंहाविषयी माहीतीची उपलब्धता तपासण्याचा प्रयत्न केला आहे. व ही संग्रहीत माहीती तक्ता क. 2 मध्ये ग्रंथालयाबद्दल, ग्रंथालयाची भूमिका, कामाचे तास आणि सुट्टी, सदस्यत्व, ग्रंथपाल, ग्रंथालय सहाय्यक कर्मचारी, ग्रंथालय विभाग, चालु संशोधन, ग्रंथालय सेवा इत्यादी माहिती सादर केली आहे. आणि तक्ता क 3 मध्ये संशोधनाअंर्तगत असलेल्या सहाही कृषी विद्यापीठ संकेतस्थळामध्ये ग्रंथ, नियतकालिके, संदर्भ ग्रंथ, अहवाल, प्रबंध आणि नियतकालिकेच्या जुण्या खंडांची माहीती दिलेली आहे.

**कृषी विद्यापिठीय ग्रंथालय सेवांबद्दल माहितीः–**

| सामान्य माहिती | मुंबई | राहूरी | अकोला | दापोली | परभणी | नागपूर |
|---|---|---|---|---|---|---|
| सी.डी/डी.व्ही.डी सेवा | X | √ | √ | X | X | X |
| वेब ओपॅक | √ | √ | √ | √ | √ | √ |
| इंटर लायब्ररी लोण | √ | √ | √ | X | √ | √ |
| प्रचलित जागरूकता सेवा | √ | √ | √ | √ | √ | √ |
| महितीचा प्रसार | √ | √ | √ | √ | √ | √ |
| डेटाबेस प्रवेश | √ | √ | √ | √ | √ | √ |
| इंटरनेट आधारित सेवा | √ | √ | √ | √ | √ | √ |
| संदर्भ सेवा | √ | √ | √ | √ | √ | √ |
| ग्रंथालय प्रकाशन | X | √ | X | X | X | X |
| पुनरूत्पादन सेवा | X | √ | √ | X | √ | √ |
| डिजिटल ग्रंथालय | √ | √ | √ | √ | √ | √ |
| अभिसरण | √ | √ | √ | √ | √ | √ |
| ई–संसाधन | √ | √ | √ | √ | √ | √ |
| Wi-Fi कनेक्टिव्हीटी | X | X | X | X | X | X |

तक्ता क. 4

**तथ्य संकलन पध्दती व तंत्रेः–**

प्रस्तुत संशोधन प्रकल्पाकरिता आवश्यक तथ्ये संकलीत करण्याकरिता प्राथमिक तथ्य संकलन पध्दतीतील कृषी विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळाची ओळख करण्याकरिता निरिक्षण आणि दुरध्वनीच्या माध्यमातुन माहितीतंत्रज्ञानाचा उपयोग करून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी प्राप्त शोध प्रबंधासंदर्भात तथ्ये संकलीत केली आहे.

त्याचप्रमाणे व्दितीय तथ्य संकलन पध्दतीतील पूर्वी झालेले संशोधन लेख, अहवाल, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संदर्भात वेगवेगळया विचारवंतांनी ग्रंथालयाबद्दल मांडलेले विचार, त्यांचे लेखन साहित्य या सर्वाचा आढावा प्रस्तूत संशोधन लेख पुर्ण करण्यारिता घेतला आहे.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात आंतराजाळयाच्या माध्यमातून देखील विषयाशी संबंधीत काही महत्त्वपूर्ण माहिती मिळाल्यास अशा सर्व वेगवेगळया माध्यमातुन विषयाशी संबंधीत माहितीच्या आधारे प्रस्तुत संशोधन लेख दर्जेदार स्वरूपात सादर करण्याचा प्रयत्न केला आहे .

**तथ्ये विश्लेषण आणि सादरीकरणः–**

प्रस्तुत संशोधन लेख विषयावरील प्राथमिक आणि दुय्यम पध्दती व तंत्रे यांचा अवलंब करून संकलीत झालेल्या माहितीचे संख्यात्मक, तक्तास्वरूपात, आणि लेख पध्दतीने मांडणी करून विश्लेषण केले आहे.

**निष्कर्षः–**

प्रस्तुत सशोधन कार्यात महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठाच्या ग्रंथालयीन संकेतस्थळावरील असलेली विविध विभागांची माहीतीचे व्यवस्थापन आणि उपयोगीता तपासण्यात आली.वापरकर्त्यांशी संपर्क साधण्याचे आणि ग्रंथालयांच्या सेवा दर्शविण्याचे अनेक मार्ग आणि माध्यमे वाढत असली तरी ग्रंथालय संकेतस्थळ हे वापरकर्त्यासाठी किवां संशोधकांसाठी सर्वात प्रभावी साधन आहे. आणि ते व्हर्च्युअल गेटवेपैकी एक आहे. कृषी विद्यापीठ ग्रंथालय हे वापरकर्त्यांना अनुकूल असावे. वापरकर्त्यांना समजेल अशी भाषा असावी. स्पष्ट रचना, विविध वापरकर्ता गटांसाठी पर्याय आणि सर्व माहीती अद्ययावत असावी. कृषी विद्यापीठ ग्रंथालयाच्या कुशल आणि तज्ञ कर्मचाऱ्यांना वापरकर्त्यानंतर ग्रंथालय संकेतस्थळ विकसीत करण्यासाठी तपास करणे आणि त्याचा वापर करणे आवश्यक आहे. कृषी विद्यापीठ ग्रंथालयातील सर्वसामान्या माहितीचा विचार केला असता वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी विद्यापीठीय ग्रंथालय संकेतस्थळावर ग्रंथालयाबद्दल, ग्रंथालयाची भुमिका, कामाचे तास, आणि सुट्टी, सदस्यत्व, ग्रंथपाल, आणि ग्रंथालय सहाय्यक कर्मचारी, ग्रंथालय विभाग, चालु संशोधन आणि ग्रंथालय सेवा ही सर्व माहिती उपलब्ध आहे. त्याप्रमाणेच महाराष्ट्रातील सहाही विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळामध्ये ग्रंथालयातील संग्रह उपलब्ध आहे. तसेच महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहूरी या कृषी विद्यापीठ ग्रंथालय संकेतस्थळावर कृषी विद्यापीठीय ग्रंथालय सेवांबद्दल सर्वात जास्त माहीती उपलब्ध आहे.

## संदर्भसुची


1.आगलावे, प्रदीप (2010). *सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे* (आवृत्ती 3). नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.

2.कऱ्हाडे, बी.एम. (2018). *शास्त्रीय संशोधन पद्धती* (चवथी आवृत्ती). नागपूर : मनोहर पिंपळापुरे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.

3.नरवणे, मीनल., (2016). *संशोधन पध्दती: शैक्षणिक व सामाजिक* (प्रथमावृत्ती). पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.

4.निकोसे, सत्यप्रकाश., (2007). *ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधन पद्धती* (सुधारित आवृत्ती). नागपूर : प्रज्ञा प्रकाशन.

5.फडके, द. ना., (2015). *ग्रंथालय संगणकीकरण आणि आधुनिकीकरण* (आवृत्ती 6). पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन. (पेज नं. 263,264, 361, 459, 461, 462, 463)

6.बोधनकर, सुधीर., अलोणी, विवके., आणि कुलकर्णी, मृणाल (2014). *सामाजिक संशोधन पद्धती* (आवृत्ती 7) नागपूर : श्री साईनाथ प्रकाशन.

7.माळी, सुनिल (2013). *सामाजिक संशोधन पद्धती* (प्रथम आवृत्ती), पुणे : मधुराज प्रिटर्स ॲण्ड पब्लीकेशन प्रा. लि.

8.रानडे, संध्या (2017). *जुगाड : कल्पक संशोधनासाठीचा नवा दृष्टिकोन* (प्रथम आवृत्ती), पुणे : मनोविकास प्रकाशन.

9.शर्मा, अरविंद कुमार (2012). *ई – सुचना* (प्रथम आवृत्ती), दिल्ली : ई.एस. ई. एस. पब्लीकेशन

10.Kumar, P.S.G. (2004). *Research Methods and statistical Techniques* (First edition), Delhi : B.R. Publishing Corporation

11.Nikose, Satyprakash (2006). *Resource sharing Through Networking of University Libraries* (First edition), Chadrapur : Pradhnya Prakashan.

12.Phophalia; A.K. (2010). *Modern Research Methodology : New Trends and Techniques* (First edition), Jaypur : Paradise Publishers

13.Upagde, Vijay and Dr. Shende, Arvind (2015). *Research Methodology* (First edition), New Delhi : S Chand & Company Pvt. ltd.

https://www.cife.edu.in/library.html

https://dbskkv.org/Library.html

https://education.icar.gov.in/Univ_Details_New?Univ=IPJVGIM1ufjxcnyaX4nEVhSrhbAKWssR

http://library.mafsu.in/

https://mpkv.ac.in/Library/About

https://www.vnmkv.ac.in/Home/Library